**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **विधी विद्यापीठातून केवळ कायद्याची पुस्तकी ओळख करून घेण्याऐवजी कायद्यामागची भूमिका, इतिहास, व्यावहारिक उपयोग आणि अंमलबजावणी समजून घेणे आवश्यक सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचे नागपुरात प्रतिपादन.**
2. **नागपूर जिल्ह्यातील रामटेक जवळ 128 एकर जागा फिल्म सिटी साठी निश्चित: राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची माहिती.**
3. **बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्यासंदर्भात राज्य सरकारकडून पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन.**
4. **सीबीएसईच्या १० वी आणि १२वी च्या परीक्षांना सुरुवात.**

----------------------------

**विधी विद्यापीठ**

विधी कारकीर्दीत सखोल अभ्यास तसंच कायद्याची समज आवश्यक असते. विधी विद्यापीठातून कायद्याची केवळ पुस्तकी ओळख करून घेण्याऐवजी कायद्यामागची भूमिका, इतिहास, कायद्याचा व्यावहारिक उपयोग आणि अंमलबजावणी समजून घेणे आवश्यक असते. तुमच्या कामामुळे, लोकांचे जीवनमान तसंच स्वातंत्र्य यावर परिणाम होतो त्यामुळे विधी कारकीर्द, हे सगळ्यात महत्त्वपूर्ण असं क्षेत्र ठरते असं प्रतिपादन, भारताचे सर-न्यायाधीश संजीव खन्ना यांनी आज केलं. नागपरच्या वर्धा रोड स्थित, वारंगा इथल्या महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ अर्थात एम.एन.एल.यु.नागपूरचा तिसरा दीक्षांत समारंभ, आज आयोजित करण्यात आला होता या समारंभाला मुख्य अतिथी म्हणून, भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना संबोधित करत होते. यावेळी त्यांनी वकिलांच्या समाजातील स्थानाचं महत्व अधोरेखित केलं.

*The second aspect that I want to highlight is using your degree as a tool of social change and good. This reminds me of an*

*important truth about our profession: lawyers have always been the architects of social change. From our nation's struggle for independence, to fighting against invasion of privacy, lawyers have been at the forefront of social movements.*

याप्रसंगी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि विद्यापीठाचे कुलपती न्यायमूर्ती भूषण गवई, कुलगुरू प्रा.डॉ.विजेंदर कुमार उपस्थित होते. या समारंभात, एकंदर १५५ पदवीधरांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. ज्यात ११२ पदवीपूर्व पदव्या, २८ पदव्युत्तर पदव्या आणि १५ पीएच.डी. पदव्या समाविष्ट होत्या. या दीक्षांत समारंभात उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीसाठी, विद्यापीठाचे सुवर्णपदक, बीए एल.एल.बी. या पाच वर्षीय अभ्यासक्रमाचे विद्यार्थी, विश्वजीत राव आणि विद्यार्थिनी आकांक्षा बोहरा यांना, सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलं. विधी विद्यापीठातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना, कारकीर्दीच विस्तीर्ण असं क्षेत्र खुलं असून, ते मध्यस्थी क्षेत्रात विशेषज्ञता प्राप्त करू शकतात तसंच एरोनॉटिकल लॉ, मेरीटाईम लॉ, कार्पोरेट लिटीगेशन या क्षेत्रातही आपलं करिअर करू शकतात परंतु कुठल्याही क्षेत्रात जाण्यासाठी कठोर मेहनती शिवाय पर्याय नसल्याचं प्रतिपादन, या विद्यापीठाचे कुलपती, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी दीक्षांत समारंभाप्रसंगी केलं.

----------------------------

**फिल्म सिटी**

नागपूर जिल्हयातील रामटेक जवळ, 128 एकर जागा, फिल्म सिटीसाठी निश्चित करण्यात आल्याची माहिती, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी, आज नागपूरात प्रसार माध्यमांशी बोलतांना दिली.

***आज नागपुरच्या जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आशीष जयस्वालजी आणि जिल्हाधिकारी, फिल्म सिटीचे अधिकारी, महसूल आणि सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिकारी अश्यांची संयुक्त बैठक होऊन या ठिकाणी 128 एकर रामटेक जवळची जागा विदर्भाच्या भागामध्ये सुधा चित्रपट निर्मितीला चालना मिळावी यासाठी फिल्म सिटीला या ठिकाणी जागा देण्याच्या संदर्भातली चर्चा झाली. महसूल विभागाकडून जिल्हाधिकारी सांस्कृतिक विभागाकडे 128 एकर***

***जागा हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव 15 दिवसामध्ये, त्याठिकाणी आता गती दिली जाईल.***

नागपूर जिल्ह्यातील फिल्मसिटी यशस्वी व्हावी यासाठी एक कन्सल्टंट नेमण्याचा निर्णयही झाला असल्याचं शेलार यांनी यावेळी सांगितल. याप्रसंगी अर्थराज्यमंत्री आणि रामटेकचे आमदार अॅड.आशिष जयस्वालही उपस्थित होते.

-----------------------------

**परीक्षा पे चर्चा**

आत्मपरीक्षण आणि जागरूकता हे दोन महत्वाचे गुण आहेत. त्याआधारे विद्यार्थी आपल्या विचारसरणीत, स्पष्टता आणि लवचिकता आणून ध्येयपूर्तीचा मार्ग निश्चित करू शकतात असं, प्रख्यात आध्यात्मिक मार्गदर्शक, सद्गुरु जग्गी वासुदेव यांनी म्हटलं आहे. परीक्षा पे चर्चा कार्यक्रमाच्या, 'मनःशक्तीचे सामर्थ्य' या पाचव्या भागात, त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला, त्यावेळी ते बोलत होते. शैक्षणिक क्षेत्रातल्या यशापेक्षाही, आंतरिक वाढ महत्वाची असल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विश्वास असल्याचं त्यांनी सांगितलं.

-----------------------------

**रोड ट्रेन**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपुरात, व्होल्वो ग्रुपच्या, भारतातील पहिल्या रोड ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला. भारताच्या लॉजिस्टिक्स क्षेत्रात, परिवर्तनशील मैलाचा दगड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि प्रगत आणि पर्यावरण पूरक वाहतूक उपायांसाठी, देशाच्या वचन बद्धतेला बळकटी देत, टिकाऊपणाला चालना देताना, लॉजिस्टिक कार्यक्षमता वाढवण्यासाठी, हा महत्त्वपूर्ण प्रकल्प तयार केला आहे.

-----------------------------

**विमानतळ**

राज्यातली विमान सेवा आणखी तत्पर आणि सुकर करण्याच्या उद्देशानं नांदेड, लातूर, यवतमाळ, सोलापूर आणि अमरावती विमानतळ लवकरच शासन, खाजगी कंपनीकडून, एम.आय.डी.सी.कडे हस्तांतरित करणार असल्याची माहिती, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे.

-----------------------------

**सात सदस्यीय समिती**

बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विरोधातल्या नव्या कायद्यातल्या, कायदेशीर बाबींचा अभ्यास करण्यासाठी, राज्य सरकारनं, राज्याच्या पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या समितीत, महिला आणि बालकल्याण विभाग, अल्पसंख्याक व्यवहार विभाग, विधी आणि न्याय विभाग, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग या विभागांचे सचिव तसंच गृह विभागाच्या उप-सचिवांचा समावेश आहे. ही समिती बळजबरीनं केलं जाणारं धर्मांतर आणि लव्ह जिहाद विषयी राज्यातल्या सद्यस्थितीचा अभ्यास करेल आणि यासंदर्भातल्या तक्रारींवरील, कार्यवाही साठीच्या उपाय योजना सुचवणार आहे. सोबतच ही समिती या मुद्यांशी संबंधीत इतर राज्यांमधल्या कायदेशीर तरतुदी आणि कायदेही तपासून पाहणार आहे. या संदर्भात राज्य सरकारनं काल रात्री उशिरा अधिसूचना जारी केली होती.

----------------------------

**सीबीएसई परिक्षा**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ अर्थात सी.बी.एस.ई.च्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांना आजपासून प्रारंभ झाला. देशातल्या ७ हजार ८४२ तर, परदेशातल्या २६ केंद्रांवर या परीक्षा होत आहेत. यंदा ४२ लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षा देत आहेत. यंदा इयत्ता दहावीच्या परीक्षांसाठी २४ लाख १२ हजारापेक्षा जास्त तर बारावीच्या परीक्षांसाठी, १७ लाख ८८ हजारापेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून ते १२० विषयांमध्ये परीक्षा देणार आहेत. भारतात ७ हजार ८४२ परीक्षा केंद्रे तसंच परदेशी केंद्रांवर, ही परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. दहावीच्या परीक्षा १८ मार्च तर बारावीच्या परीक्षा चार एप्रिल रोजी संपणार आहेत.

----------------------------

**सेवालाल महाराज जयंती**

वाशिम जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र पोहरादेवी येथील संत सेवालाल महाराजांच्या समाधीस्थळी आज हजारो सेवा भक्तांच्या साक्षीनं सदगुरू, संत सेवालाल महाराज यांचा २८६वा जन्म सोहळा, भोग, भंडारा, महाआरती आणि पाळणा गीत गायन करून साजरा करण्यात आला. यावेळी जय सेवालाल असा जयघोष करण्यात आला. संत सेवालाल महाराज जयंती सोहळ्याला, मृद आणि जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्यासह, देशभरातील

हजारो सेवा भक्तांची उपस्थिती होती. हजारो भाविकांनी महाप्रसादाचाही लाभ यावेळी घेतला.

-----------------------------

**संविधान दिंडी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात, ७व्या संविधान दिंडीचं आज आयोजन करण्यात आलं. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायाधीश न्यायमूर्ती रोहित जोशी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ.राजेंद्र काकडे यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करीत, महाविद्यालयाच्या प्रांगणातून संविधान दिंडीस सुरुवात करण्यात आली. न्यायमूर्ती रोहित जोशी यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संबोधित करताना भारतीय संविधानातील मुल्ये आणि तत्वज्ञान याचे महत्त्व सांगितले. प्रत्येक भारतीयांच्या हृदयाशी संविधानातील मूल्ये जोडलेली असल्याचं ते म्हणाले.

-----------------------------

**संविधान परिसंवाद**

संविधान निर्माते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी, देशाला मजबुत संविधान दिलं आहे आणि ते सदैव देशवासियांच्या हृदयात राहील असं प्रतिपादन बडनेऱ्याचे आमदार रवि राणा यांनी केलं. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्तानं संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील, डॉ.आंबेडकर अभ्यास केंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग, श्रीगजानन महाराज शिक्षण संस्था आणि नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेरा इथल्या इतिहास विभागाच्या संयुक्त विद्यमानं आयोजित, राष्ट्रीय परिसंवाद कार्यक्रमात, प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते.

-----------------------------